रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)

मुख्यकचेरी : प्लॉट क्र.बीसी/१, गेट नं.५ च्या शेजारी, पेट्रोलपंपाच्या मागे, गुलटेकडी,
मार्केटयार्ड, पुणे ४११०३७

☎ 020-24270148/0548 www.rupeebank.com ✉ admin@rupeebank.com

आरसीबी/०१/प्रशासन/२०२५-२६/कॉन- दि.२३.०६.२०२५

:: जाहीर निवेदन ::

:: बँकेच्या कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, दौंड व बारामती या शाखांमधील स्थानिक कोर्ट केसेस, शासकीय व अन्य कामांसाठी स्थानिक माजी सेवकांची आवश्यकता ::

बँकेच्या कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, दौंड व बारामती या शाखांचे कामकाज पुण्यातील शाखा इमारतींमधून करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित शाखांच्या विविध न्यायालयातील, शासकीय कार्यालयात प्रलंबित केसेसला हजर रहाणे, अर्ज व कागदपत्रे सादर करणे, स्थानिक वकिलांशी समन्वय साधणे, पाठपुरावा करणे, कर्जदार, जामीनदार यांना नोटीसेस पोहोचविणे, बँकेने जप्त केलेल्या किंवा जप्त करावयाच्या त्यांच्या मालमत्तांना समक्ष भेट देणे, त्याचप्रमाणे अन्य स्थानिक सरकारी / निमसरकारी कार्यालये, अन्य संस्था यांचेकडे मुख्यकचेरीच्या सूचनेनुसार कागदपत्रे पोहोचविणे, त्याचा पाठपुरावा करणे इत्यादी कामकाजासाठी संबंधित ठिकाणच्या स्थानिक माजी सेवकांची आवश्यकता आहे.

तरी इच्छुक स्थानिक माजी सेवकांनी आपले अर्ज बंद पाकिटात पोस्टाद्वारे आणि अथवा समक्ष मुख्यकचेरी, प्रशासन विभाग येथे पाठवावेत.

सदरच्या कामाकरिता प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या दिवसासाठी **प्रतिदिन ₹५००/- (रुपये पाचशे फक्त)** इतका भत्ता देण्यात येईल.

संबंधित माजी सेवकांना वरीलप्रमाणे कामकाज सोपविण्याबाबतचा अवसायक यांचा निर्णय अंतिम राहील.

अधिक माहितीसाठी मुख्यकचेरी, प्रशासन विभागाशी संपर्क साधावा.

सरव्यवस्थापक
रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)